# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## (क्रिडा व शारिरिक शिक्षण विभाग)

एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५
फोन नंबर ०७१३२-२२३१०९, मो.नं.९८५०३८८५७०


जा.क्रं.गों.वि./2816/२०१६ दिनांक:- १३/०६/२०१६

प्रती,
मा. प्राचार्य,
संलग्नीत सर्व महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :- दिनांक २१ जुन २०१६ रोजी दुसरा "आंतरराष्ट्रीय योग दिवस" साजरा करणेबाबत.**

**संदर्भ :-** उशिसं/२०१६/आंयो.दि./म.वि.-१/७०११, दिनांक ०९/०६/२०१६

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने दिनांक २१ जुन २०१६ रोजी दुसरा "आंतरराष्ट्रीय योग दिवस" साजरा करावयाचा आहे. करिता आपले महाविद्यालयातील सर्व एन.सी.सी., एन.एस.एस., क्रिडा व खेळामध्ये भाग घेणारे विद्यार्थी व शिक्षण घेणारे विद्यार्थी, महाविद्यालयात कार्यरत असलेले कर्मचारी यांचे सहयोगाने "आंतरराष्ट्रीय योग दिवस" साजरा करण्यात यावा. महाविद्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठाला लगेच कळविण्यात यावे, जेणेकरुन सविस्तर एकत्रित अहवाल विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण) यांना सादर करता येईल.

(डॉ. विनायक इरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सोबत :-

१) दिनांक ०९/०६/२०१६ चे संदर्भीय शासन पत्राप्रमाणे.

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय,
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

Web : www.dhepune .gov.in E-Mail : mavi.dhepune@gov..in

फोन नं. ०२० / २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९. फॅक्स नं.- ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/२०१६/आंयोदि/मवि-१ /७०७७ दि. ०९/०६/२०१६

तात्काळ

प्रति,

१) कुलसचिव, अकृषी विद्यापीठे (सर्व).
२) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सर्व विभाग.
३) प्राचार्य , राज्यातील सर्व महाविद्यालये.

**विषय- दि.२१ जून २०१६ रोजी दुसरा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याबाबत.**

संदर्भ - १) शासन पत्र क्र. संकीर्ण ११११/प्र.क्र.७०/१६/समन्वय,दि.०७.०६.२०१६
२) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र दि.२९.०२.२०१६, दि.१७.०३.२०१६ व दि.०९.०५.२०१६
३) मा.पंतप्रधान यांचे पत्र दि.०१.०६.२०१६

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय शासन पत्रासोबत श्रीमती ईशिता रॉय, संयुक्त सचिव मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र दि.१३.०५.२०१६ ची प्रत देण्यात आलेली आहे. दि.२१ जून २०१६ रोजी दुसरा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करावयाचा आहे. दि. २१ जून २०१६ पर्यंत बहुतांश विद्यापीठ व महाविद्यालयांचे शैक्षणिक सत्र सुरु होत आहे तथापि अपवादात्मक परिस्थितीत उन्हाळी सुट्ट्या असल्यास सदर दिवस NCC Cadets / NSS च्या सहयोगाने यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी या कालावधीत विद्यापीठ व महाविद्यालये सुरु ठेवण्याबाबत उपरोक्त केंद्र शासनाच्या पत्राद्वारे सूचित केलेले आहे.

संदर्भ क्र.२ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्रातही योग दिन साजरा करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच संदर्भ क्र.३ मा.पंतप्रधानांच्या पत्रातही योग दिन साजरा करण्याच्या सूचना दिलेल्या असून याबाबतची अधिक माहिती आयुष मंत्रालय , भारत सरकार यांच्या www.ayush.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे तसेच सर्व महाविद्यालयात दि.२१ जून, २०१६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात यावा. महाविद्यालये तसेच विद्यापीठांनी केलेल्या कार्यवाहीचे अहवाल संबंधित विभागीय सहसंचालक ( उच्च शिक्षण) यांचेकडे सादर करावेत. महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अहवाल विभागीय सहसंचालकांनी संचालनालयास सादर करावेत

( डॉ. धनराज माने )
संचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

सोबत-
संदर्भिय शासन पत्राची प्रत

प्रत-

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय

Fr 3 Feb 2015/Letter 2015-16/letter